**कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या पदावर <u>प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत.</u>**

**श्रीम. प्रिती विनायक रोडगे, मुख्य सांख्यिक, कृषी आयुक्तालय, पुणे.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन आदेश क्र.पंदेवि- १३२६ /प्र.क्र.११ /६-अे (१५३६२९६)**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दिनांक :- ३० जानेवारी, २०२६.

<u>संदर्भ</u>:-सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या.१२, दि.१६.०२.२०१८.

## <u>शासन आदेश</u>

श्रीम. प्रिती विनायक रोडगे, मुख्य सांख्यिक, कृषी आयुक्तालय, पुणे यांची कृषी व पदुम विभागाच्या अधिपत्याखालील कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या पदावर प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्याकरीता मा.मुख्यमंत्री महोदय यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने श्रीम. प्रिती विनायक रोडगे, मुख्य सांख्यिक , कृषी आयुक्तालय,पुणे यांची कृषी व पदुम विभागाच्या अधिपत्याखालील कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या पदावर प्रथमतः तीन वर्षासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

अ) श्रीम. प्रिती विनायक रोडगे, मुख्य सांख्यिक यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी हा या आदेशाच्या दिनांकापासून सुरू होईल, त्यानुसार त्यांनी तात्काळ प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू व्हावे.

ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

क) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा, स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र, याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेतर नियोक्त्याने शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे. तसेच, कोणत्याही परिस्थितीत शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय परस्पर कार्यमुक्त करण्यात येऊ नये.

ड) श्रीम. प्रिती विनायक रोडगे, मुख्य सांख्यिक यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील..

इ) श्रीम. प्रिती विनायक रोडगे, मुख्य सांख्यिक यांची वेतनश्रेणी एस-२३: (रू.६७७००-२०८७००) अशी असून, त्यांना कुलसचिव, पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या पदाची एस-२७ : (रू.११८५००-२१४१००) ही वेतनश्रेणी अवनत करून, प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात येत आहे.

फ) श्रीम. प्रिती विनायक रोडगे, मुख्य सांख्यिक हे त्यांना, त्यांची वेतनश्रेणी एस-२३ नुसार देय वेतन आहरीत करतील.

**३.** श्रीम. प्रिती विनायक रोडगे, मुख्य सांख्यिक यांना सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी लागू केलेल्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती लागू राहतील.

**४.** सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०१३०१७२२३६६९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.01.30 17:23:37 +05'30'

**( प्रतिभा पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव.
५. अपर मुख्य सचिव (कृषि ), मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, कृषी आयुक्तालय,पुणे.
७. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे.
८. कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
९. उपसचिव (१५अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
११.श्रीम. प्रिती विनायक रोडगे, मुख्य सांख्यिक,कृषि आयुक्तालय,पुणे.
१२. निवडनस्ती- ६अे.